# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.02.2025** **वारःबुधवार**

1. सरकारच्या निरंतर प्रयत्नांमुळे विकसित भारताचं स्वप्न लवकरच पूर्ण होईल-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लोकसभेत विश्वास
2. टेमघर प्रकल्पाच्या मजबुतीकरणाच्या कामांसाठी 315 कोटी रूपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता;
3. भाडेपट्ट्यानं दिलेल्या जमिनी वर्ग-1 मध्ये रूपांतरित करण्यासाठी कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस वर्षभराची मुदत वाढ
4. तेवीसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव रंगणार 13 फेब्रुवारी पासून आणि,
5. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये 16 सुवर्णपदकांसह महाराष्ट्र पदक तालिकेतल्या तिसऱ्या स्थानावर कायम

**मोदी-उत्तर**

आपल्या सरकारची जनतेच्या विकासाप्रति असलेली कटीबद्धता आणि त्यासाठी केलेल्या कामांमुळे विकसित भारताचं स्वप्न लवकरच साकार होईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत व्यक्त केला.

राष्ट्रपतींनी केलेल्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शक प्रस्तावावर उत्तर देतांना पंतप्रधान बोलत होते. राष्ट्रपतींनी केलेलं अभिभाषण हे प्रेरणादायी आणि विकसित भारताच्या सरकारच्या प्रयत्नांना बळ देणारं होतं, असं मोदी म्हणाले.

गरीब लोकांच्या कल्याणासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे 25 कोटी जनतेला गरिबीतून बाहेर काढण्यात यश आलं आहे. लोकांचा पैसा कोणतीही गळती न होता लोककल्याणासाठीच वापरला जावा, या आमच्या धोरणाची फळं दिसून येत आहेत. भांडवली खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करून ती (तरतूद) 11 लाख 21 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक केल्याचं मोदी यांनी सांगितलं. आयुष्यमान भारत, स्वच्छता अभियान, जल जीवन अभियान अश्या विविध योजनांबरोबरच लखपती दीदी, किसान सन्मान निधी, आदिवासी कल्याण योजना यासारख्या योजनांमुळे लोकांचं जीवनमान उंचावल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, अणुऊर्जा, अंतराळ विकास अशा क्षेत्रांना आपण प्राधान्य देत असल्याचं मोदी म्हणाले.

पंतप्रधानांच्या भाषणानंतर लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव स्वीकारण्यात आला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**कृषी-भ्रष्टाचार**

कृषी क्षेत्रातली कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही. पीक विमा योजनेत भ्रष्टाचार झाल्याचं आढळल्यास दोषींवर कारवाई केली जाईल, असा निर्वाळा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल लोकसभेत दिला. महाराष्ट्रात कृषी विभागात 5 हजार कोटी रुपयांचा कथित भ्रष्टाचार झाल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

**मंत्रीमंडळनिर्णय**

पुणे जिल्ह्यातल्या टेमघर प्रकल्पाची गळती रोखण्यासाठी आणि त्याचं मजबुतीकरण करण्याच्या कामांसाठी 315 कोटी 5 लाख रूपयांच्या खर्चाला काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले.

टेमघर धरणाला प्रकल्पाला गळती लागल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. धरणाची गळती रोखण्यासाठी तातडीने उपाय योजना केल्यानंतर शेतकऱ्यांनाही सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

शासकीय भोगवटादार वर्ग-2 च्या जमिनी वर्ग-1 मध्ये रूपांतरित करण्यासाठी सवलतीच्या दरानं अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेला वर्षभराची मुदत वाढ देण्याकरता मान्यता देण्यात आली. भाडेपट्ट्यानं दिलेल्या जमिनींच्या रुपांतरणाची अनेक प्रकरणं प्रलंबित असल्यानं ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वर आणि जावळी तालुक्यात कोयना जलाशयामध्ये 25 बुडीत बंधारे बांधण्यासाठी 170 कोटी रूपयांची तरतूद करण्याच्या कामालाही काल झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**मैत्रीपोर्टल**

'ईज ऑफ डुइंग बिझनेस' धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करुन गुंतवणूकदारांना सुलभ सेवा पुरविण्यासाठी उद्योग विभागाच्या मैत्री कक्षाच्या नूतनीकृत MAITRI 2.0 या पोर्टलचं अनावरण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. MAITRI पोर्टल उद्योग, गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभीकरणासाठी सुरू करण्यात आलं आहे.

**विशेष मदत-अजित पवार**

अवैधता प्रकरणांमध्ये नुकसान भरपाईसाठी तातडीनं मदत करण्याच्या दृष्टीनं गृह विभागाप्रमाणेच राज्य उत्पादन शुल्क विभागानंही कायमस्वरुपी धोरण तयार करावं, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिले आहेत.

अवैध दारू विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या नाशिकमधल्या राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातले वाहन चालक जवान-कैलास कसबे यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून विशेष बाब म्हणून साडेसात लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली, त्यावेळी पवार बोलत होते.

**मुंबई-अर्थसंकल्प**

मुंबई महानगरपालिकेचं 2025 -26 या वर्षासाठीचं 74 हजार 427 कोटी रुपयांचं शिलकीचं अंदाजपत्रक काल सादर करण्यात आलं. मुंबई महापालिकेचा कोणतीही करवाढ, शुल्कवाढ नसलेला हा अर्थसंकल्प विद्यार्थ्यांपासून चाकरमान्यांपर्यंत आणि गरीब कष्टकऱ्यांपासून उद्योजकांपर्यंत सर्व वर्गांच्या शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आदी सुविधांचा विचार करणारा आहे, हा अर्थसंकल्प आधुनिक मुंबईचा शुभारंभ ठरेल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

**पिफ**

तेवीसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2025 अर्थात पिफ-13 ते 20 फेब्रुवारी दरम्यान पुण्यात होणार आहे. महोत्सवाचं उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांच्या हस्ते 13 तारखेला होणार असल्याची माहिती महोत्सवाचे संचालक डॉक्टर जब्बार पटेल यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. 'शो मॅन-राज कपूर' ही यंदाच्या महोत्सवाची संकल्पना आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे तसंच ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना पिफ डिस्टींग्विशिंग अवॉर्ड या लक्षवेधी पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय ज्येष्ठ गायिका कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन गौरवलं जाणार आहे.

महोत्सवात विविध विषयांवर चर्चासत्र, कार्यशाळा होणार असून रसिकांना जगभरातले नावाजलेले चित्रपट पाहण्याची संधी मिळणार आहे.

**महिला आयोग**

राष्ट्रीय महिला आयोगातर्फे आगामी तीन महिन्यात देशभरात तरुणांसाठी विवाहपूर्व समुपदेशन केंद्र मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी काल पुण्यात दिली. आयोगातर्फे काल 'हम तुम' या विवाहपूर्व समुपदेशन विषयक एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत रहाटकर बोलत होत्या. या परिषदेविषयी अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**पतिपत्नीच्या नात्यातील वाढता विसंवाद, त्याचा संपूर्ण कुटुंबावर होणारा परिणाम, बिघडणारं कौटुंबिक स्वास्थ्य, दुसरीकडे लग्न न करण्याचा तरुणांमध्ये वाढत असलेला कल, विवाह झाल्यानंतरही अपत्यप्राप्ती नको म्हणणारी तरुण पिढी आणि या सगळ्यामधून कुटुंब संस्थेला पोहोचणारा धोका लक्षात घेऊन वैवाहिक जीवनातील भूमिका आणि जबाबदारी तरुण पिढीला समजावून सांगण्याच्या दृष्टीनं विवाहपूर्व समुपदेशन केंद्रांची स्थापना करण्याचा निर्णय राष्ट्रीय महिला आयोगानं घेतला आहे. अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम तयार करणं, त्याचं विद्यापीठांच्या माध्यमातून प्रशिक्षण देणं असं नियोजन केलं जात आहे. मुळात देशाच्या विविध विभागातील समजांची मानसिकता,**

**विवाहाबद्दलच्या विभिन्न प्रथा परंपरा, विवाहेच्छू मुलामुलींना मिळणारं विचार आणि निर्णय स्वातंत्र्य लक्षात घेऊन त्यानुसार अशा समुपदेशनासाठी वेगवेगळी प्रारुपं तयार करावीत, आदिवासी समाज, अनुसूचित जातीजमाती यांच्यातील लग्नाच्या पद्धती जाणून घेऊन त्यांच्यातील असुरक्षिततेची भावना दूर करण्यावर भर द्यावा, अशा सूचना देशातील विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी यावेळी सादरीकरणाद्वारे केल्या. मुलामुलींचे पालक, नातेवाईक इतकंच नव्हे, तर नवविवाहितांच्या समुपदेशनाची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.**

**अभिवादन**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जन्म-वर्षानिमित अहिल्या नगर जिल्ह्यातल्या चौंडी इथे अभिवादन सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या रविवारी होणाऱ्या या विशेष सभेमध्ये देशभरातल्या 400 कर्तृत्ववान महिला सहभागी होतील, अशी माहिती महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थचे कार्याध्यक्ष रवींद्र देव यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

**राष्ट्रीय क्रीडा**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये 16 सुवर्णपदकांसह महाराष्ट्र पदक तालिकेत तिसऱ्या स्थानावर कायम आहे. मात्र 31 रौप्य आणि 27 कांस्य पदकांसह 76 पदकं मिळवून महाराष्ट्राच्या खात्यावर सर्वाधिक पदकं जमा झाली आहेत.

**कौशल्य विकास-लोढा-पालघर**

पालघरमध्ये कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री या संस्थेच्या सहकार्यानं तंत्रशिक्षित, तसंच दहावी, बारावी आणि पदव्युत्तर युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिलं जात आहे. येत्या वर्षभरात दोन हजारपेक्षा अधिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील, असं कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल प्रशिक्षण घेतलेल्या 27 युवकांना नियुक्तीपत्रं प्रदान करतांना सांगितलं.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ झाली आहे. हीच परिस्थिती कायम राहणार असून उद्यापर्यंत  हवामान कोरडं राहण्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार